REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 6 | MARCH - 2022

# मराठी दलित नाटकातील शोकांतिकांचे वेगळेपण

डॉ. शशिकांत ना. खिलारे
प्रमुख ,मराठी विभाग, श्रीमती चं.बा.शाह महिला महाविद्यालय,सांगली.

**सारांश :**

मराठी साहित्यात दलित साहित्याचा प्रवाह स्वातंत्र्योत्तर कालखंडात सुरु झाला असे मानले जाते ,परंतु या प्रवाहाचे मूळ शोधायचे असेल तर ते मध्ययुगीन कालखंडापर्यंत जावे लागते. संत चोखामेळा,कर्ममेळा आणि त्याच्या कुटुंबातील बंका, सोयराबाई ,निर्मळा, भागू यांनी आपल्या अभंगातून परमेश्वराची भक्ती केलेली आहेच पण आपल्या वाट्याला आलेले दुख , अन्याय, अत्याचार यांचे प्रभावी चित्रणही त्यांच्या अभंगवाणीतून आले आहे. त्यांच्या वाट्याला आलेले दुख हे चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून आलेले होते .त्याचाच आविष्कार त्यांच्या कवितेतून प्रकट झालेला आहे त्यामुळे या संतांच्या कविता ह्या दलित साहित्याचा आद्य हुंकार आहे असे वाटते .त्यानंतर आधुनिक कालखंडात इ.स.१८५५ मध्ये मुक्ताबाई या मुलीने जोतीराव फुले यांच्या प्रेरणेने 'मांगा-महारांच्या दुखाविषयी' या नावाचा निबंध लिहून दलितांच्या दुखाचा पाढा तिने साऱ्या जगासमोर वाचला होता..आधुनिक कालखंडातील दलित साहित्याचा हा प्रारंभबिंदू मानता येईल.दलित साहित्याची ही परंपरा पुढे गोपाळबाबा वलंगकर ,शिवराम जानबा कांबळे, किसन फागु बंद्सोडे यांनी समर्थपणे चालवली आहे.. विसाव्या शतकात अण्णभाऊ साठे,प्राचार्य म.भि.चिटणीस बंधू माधव इ.साहित्यकारांनी ही परंपरा पुढे नेली आहे. त्यामुळे दलित साहित्याचा प्रवाह हा पार तेराव्या शतकापर्यंत नेता येतो.असे असले तरी दलित साहित्याचा प्रवाह इ.स.१९६० नंतर तो जोमदार आणि प्रभावी बनला असे म्हणता येईल.




दलित साहित्यात कविता,कथा,आत्मकथन यासारख्या वाङ;मय प्रकाराचे विपुल लेखन झाले आहे ,परंतु दलित नाटक हा काहीसा दुर्लक्षित झालेला साहित्यप्रकार आहे. तो इ.स.१९७० च्या सुमारास उदयाला आला .असे असले तरी जोतीराव फुले यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकाशी दलित नाटकाने नाते जोडले आहे असे दिसते.तिक त्याचे प्रेरणा आहे. विसाव्या शतकाच्या सुरवातीला किसन फागु बंद्सोडे यांनी 'संत चोखामेळा' या नावाचे नाटक लिहिले होते.त्यांतर अण्णाभाऊ साठे यांनी 'इनामदार' तर प्राचार्य म.भि. चिटणीस यांचे 'युगयात्रा' ही नाटके रंगभूमीवर आली होती.या नाटकांपासून दलित रंगभूमीने प्रेरणा नाट्यलेखन केले होते. या बरोबरच

लोकरंगभूमीवरील जलसा,मेळे,फार्स आणि सत्यशोधक जलसे आणि आंबेडकरी जलसे यांनीही दलित रंगभूमीची पायाभरणी केली आहे असे म्हणता येईल.यातूनच दलित नाटकाचे विश्व उभे राहिले आहे.

दलित नाटक विसाव्या शतकातील सत्तरच्या आणि ऐंशीच्या दशकात बहरले. त्याने प्रामुख्याने दलित समाजाच्या समस्या,त्यांचे प्रश्न,दुःख, अन्याय,अत्याचार मांडले .हे सर्व मांडण्यामागे समाजप्रबोधन हीच त्याची प्रेरणा होती.शतकानुशतके झालेला अन्याय ,अत्याचार मांडताना नाटककारांनी त्या समाजाची वेदना मांडली.आपल्या प्रश्नाना वाचा फोडली.हे सर्व करत असताना त्यांनी आपल्या नाटकातून प्रस्थापित समाज व्यवस्थेला नकार दिला ,त्याविरुद्ध विद्रोह पुकारला.माणसाला माणुसकीचे हक्क मिळाले पाहिजेत म्हणून संघर्ष केला .डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आपल्या नाटकातून मांडून या नाटककारांनी समाजप्रबोधनाची कास धरली. दलित नाटकांची अनेक वैशिष्टे सांगता येतात. समस्याप्रधानता ,समाजप्रबोधन यासारखी अनेक वैशिष्ट्ये सांगता येतात दलित नाटकाच्या शोकांतिका या पारंपरिक मराठी नाटकापेक्षा वेगळ्या आहेत.

**KEYWORDS :** दलित साहित्य,दलित रंगभूमी, परंपरा ,जलसा, प्रबोधन,विद्रोह,शोकांतिका ग्रीक शोकांतिका,शेक्सपिअरीन शोकांतिका.

## प्रस्तावना:

मराठी दलित रंगभूमीचा उदय विसाव्या शतकाच्या सत्तरच्या आणि ऐंशीच्या दशकात झाला आहे असे मानले जाते.परंतु त्यात काही तथ्य नाही .दलित रंगभूमीचा जन्मच मुळात लोकरंगभूमीवरील तमाशा,जलसा जागरण,गोंधळ,भारूड यासारख्या लोककलामधून झाला आहे. परंतु लोकरंगभूमीवरील उपरोक्त लोककलांनी सामान्यजनांच्या रंजनाची भूक भागवली आहे. दलित रंगभूमीने मात्र लोकरंजानाबरोबर समाजप्रबोधनाचे उद्दिष्ट आपल्या डोळ्यासमोर ठेवले होते.त्यामुळे समाजप्रबोधन हेच दलित रंगभूमीचे प्रयोजन होते .त्यामुळेच दलित नाटकामधून वैचारिकता दिसून येते .डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान दलित नाटकातून आविष्कृत झाले आहे. आंबेडकरी चळवळीतील शिका,संघटीत व्हा,आणि संघर्ष करा हे तत्वज्ञान दलित साहित्यातून मांडले आहे. शोषित ,वंचित समाजाला न्याय प्राप्त झाला पाहिजे तसेच माणसाला माणुसकीचे हक्क प्राप्त झाले पाहिजेत हा विचार दलित नाटकातून मंडला आहे .म्हणजे दलित नाटकाने वैचारिकता जपून समाजप्रबोधनाचे विचार मांडले आहेत. हे दलित रंगभूमीच्या वैशिष्ट्यापैकी एक आहे.लोकरंगभूमीवरील भीमराव कर्डकांचा आंबेडकरी जलसा पाहून डॉबाबासाहेब आंबेडकर म्हाणाले होते की, " माझ्या दहा सभा आणि मिटींगा आणि कर्डक मंडळींचा एक जलसा बरोबर आहे."१ या उद्गारामधून जलश्याच्या आणि दलित रंगभूमीच्या प्रभावाची कल्पना येते .दलित नाटकाना सत्यशोधक जलश्यांची आणि आंबेडकरी जलश्यांची समृद्ध परंपरा लाभलेली आहे.या परंपरेमधूनच दलित नाटकाचा उदय झाला आहे.दलित नाटक पारंपरिक नाटकापेक्षा वेगळे आहे. ते त्यातील समृद्ध आशय सूत्रांनी आजपर्यंत जे अनुभव मराठी साहित्यात आले नव्हते ते अनुभव विश्व दलित नाटकाने मराठी लोकासमोर पहिल्यांदाच आणले.त्यामुळे मराठी नाट्य रसिकांचे डोळे विस्फारले तसेच ते ज्या पद्धतीने सादर झाले ते पाहून मराठी पारंपरिक नाट्य रसिकाना धक्का बसला. दलित नाटकात अस्पृशांच्या वाट्याला आलेलं दुःख त्यांची होत असलेली अवहेलना,त्यांच्या वाट्याला आलेले अन्याय ,अत्याचार यांचे भेदक चित्रण येते . दलित नाटकातून दलित समाजाचा हुंकार नाटकातून प्रभावीपणे मांडताना दलितांच्या मनातील वेदना पार काळजाला भिडणारी आहे.तर काही नाटकातून त्यांच्यावर झालेले अन्याय ,अत्याचार अत्यंत प्रभावी पद्धतीने त्यांनी मांडले आहेत.तर काही नाटकातून त्यांनी

पुकारलेला विद्रोह आगडोंबासारखा आहे.दलित नाटकातून वेदना.विद्रोह, नकार आहे पण तो मूल्यात्मक आहे. दलित नाटक व्यक्तीकेन्द्री नसून ते समूहनिष्ठ आहे.म्हणूनच दलित नाटकातील संघर्ष हा कोण्या एका व्यक्ती विरुद्ध नाही तर तो संघर्ष अन्याय करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध आहे. अन्याया विरुद्ध लढण्याची उर्जा त्याना आंबेडकरी तत्वज्ञानाने प्राप्त झालेली आहे.शतकानुशतके अन्याय सहन करणाऱ्या दलित समाजाची झालेली शोकांतिका इतर शोकांतिकेपेक्षा वेगळी आहे.समीक्षकांनी दलित नाटकाची अनेक वैशिष्ट्ये सांगितली आहेत त्यापैकी एक म्हणजे दलित नाटकातील शोकांतिका. या शोकांतिका पारंपरिक नाटकापेक्षा कशा वेगळ्या आहेत याचा शोध प्रस्तुत शोध निबंधातून घ्यावयचा आहे.

## दलित नाटकांचे स्वरूप :

मराठी साहित्यात नाट्य लेखनाची परंपरा एकोणीसाव्या शतकात सुरु झाली आहे.मराठीतील पहिल्या नाटकाचा मान विष्णुदास भावे यांच्या 'सीतास्वयंवर' या नाटकाला जातो; पण मराठी साहित्य विश्वात तंजावरमध्ये नाटकाची समृद्ध परंपरा अस्तित्वात होती असे नव्या संशोधनाने सिध्द झाले आहे.विष्णुदास भावे यांचे सीतास्वयंवर हा एक खेळ होता असे खुद्द भावे यांनीच नमूद केले आहेतसेच या नाटकास वाङ्मयीन मूल्ये नाहीत.त्यात नाटकाचे सर्व घटक नाहीत. पण त्याच काळात जोतीराव फुले यांचे 'तृतीय रत्न' हे नाटक प्रसिध्द झाले होते त्यात मात्र नाटकाच्या संकल्पनेनुसार सर्व वाङ्मयीन घटक आहेत म्हणून तृतीय रत्न हेच मराठीतील पहिले नाटक आहे हे आज सर्वांनी मान्य केले आहे.याच नाटकाची त्यास परंपरा लाभलेली आहे. दलित नाटकाने जोतीराव फुले ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पासून प्रेरणा घेतली आहे. ते वैचारिक स्वरूपाचे असून ते समस्या प्रधान आहे.त्यात जीवनाची अनुकृती आहे. .ते वास्तववादी असून ते समाज प्रबोधनकारी आहे. अशी अनेक वैशिष्ट्ये दलित नाटकात आहेत.

## शोकांतिकेचे स्वरूप :

नाटक या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास अनेक संशोधकांनी केला आहे.त्यात शोकांतिका आणि सुखात्मिका यांचा अभ्यास समीक्षकांनी केला आहे.प्रा. स.दा. क-हाडे शोकांतिकेची संकल्पना मांडताना म्हणतात,"शोकनाट्य या संकल्पनेत एका अर्थी विरोधाभास आहे,शोक,व्यथा,हालअपेष्टा ,यातना आणि संहारक आपत्ती यांच्याशी शोकनाट्याचा संबंध आहे.आणि तरीही इतर वाङ्मय प्रकाराप्रमाणे अथवा कलाप्रकाराप्रमाणे शोकनाट्य रसिक मनाला विशुद्ध कलानंद देत असतो"२ या संकल्पनेनुसार दलित नाटकात वरील सर्व वैशिष्ट्ये पाहण्यास मिळतात. दलित नाटकात शोक आहे,दुखभोग आहे.हे दुख त्याला नियतीने दिलेले नसून ते येथील चातुर्वर्णाने दिलेले आहे. चातुर्वर्ण हेच दलितांच्या दुखाचे मूळ आहे त्यामुळे त्यांच्या वाट्याला दुख आले.नाटकाच्या संकल्पनेनुसार ज्या नाटकातील नायकाच्या वाट्याला आलेले दुख त्याच्या भीषण मृत्यूत किंवा दारुण दुख स्थितीत होतो त्यास शोकांतिका असे म्हणतात.यादृष्टीने मराठी नाटकात अनेक उच्च दर्जाच्या शोकांतिकांचे लेखन झाले आहे .मराठी दलित नाटक त्यास अपवाद नाही. दलित नाटकाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील शोकांतिका.या शोकान्तिकांचा प्रकार वेगळा आहे. यासंबंधी प्रा.यादव गायकवाड म्हणतात की, "ग्रीक शोकांतिकेत नियती व मानव यांच्यातील सनातन संघर्ष वर्णिलेला आहे.या संघर्षात माणसाच्या वाट्याला दारुण असा दुखभोग येतो.आपल्या सर्व शक्तीनिशी संघर्ष करणारा हा माणूस नियतीपुढे एखादा वृक्ष उन्मळून पडावा तसा संपतो.तर शेक्सपिअरप्रणीत शोकांतिकेत नियतीविरुद्ध माणूस हे द्वन्द्व नाकारले जाते.माणसाच्या स्वभावातील एखादा चांगला अगर वाईट गुण ,स्वभावदोष हाच त्याच्या सर्वनाशाला कारण ठरतो .तर आधुनिक

काळात व्यक्तिमत्वाला येणारे रितेपण ,विमनस्कता ,मूल्यहीन व दुख तीव्र होते त्या आधारे जो शोकभाव व्यक्त करणारी कलाकृती असते,तिला आपण आधुनिक शोकांतिकेचे रूप म्हणून पाहतो" ३ मात्र दलित शोकांतिकांची जातकुळी वेगळ्या प्रकारची आहे.दलित नाटकातून आलेल्या शोकांतिका या मराठीतील शोकान्तिकापेक्षा भिन्न आहेत.दलितांच्या वाट्याला आलेला दुखभोग येथील चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील जाती व्यवस्था आणि अस्पृश्यतेमधून आलेला अहे.त्यामुळे त्यांच्या दुखाचा निर्माता कुणी परमेश्वर ,नियती अथवा एकादी व्यक्ती नसते किंवा निरर्थक जगणे,रितेपणामुळे त्याना दुख प्राप्त होत नाही .त्यामुळे पारंपरिक नाटकापेक्षा दलित नाटकातील शोकांतिका वेगळ्या प्रकारच्या आहेत.

मराठी नाटकांचा विचार केला असता मराठीतील शोकांतिकावर ग्रीक शोकान्तिकेपेक्षा शेक्सपिअरप्रणीत शोकांतिकाचाच अधिक प्रभाव आहे.कारण आपल्याकडे इंग्लिश साहित्य आणि नाटकांचे भाषांतर अधिक मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्याशिवाय इंग्रजी राजवटीचाही परिणाम येथील साहित्यावर झाला आहे.उदा.मराठीतील एकच प्याला ,नटसम्राट ,संध्याछाया ,यासारख्या अनेक नाटकांचा उदाहरण म्हणून उल्लेख करता येईल . त्यामुळे मराठी नाटकावर शेक्सपिअरप्रणीत शोकांतिकाचाच अधिक प्रभाव आहे. असे असले तरी दलित नाटक मात्र या प्रभावापासून अलिप्त राहिले आहे.दलित नाटकातील शोकांतिका या वर सांगितल्याप्रमाणे चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील जाती व्यवस्था आणि अस्पृश्यतेमधून आलेल्या आहेतया व्यवस्थेमुळे माणसाना गुलाम बनवले जाते. त्याच्यावर अन्याय ,अत्याचार केले जातात ,त्याचे विविध प्रकारे शोषण केले जाते. या बरोबरच धर्मव्यवस्थेने लादलेल्या अंधश्रधा, अनिष्ट प्रथा ,हलकी कामे, जातीयता यातूनच दलितांची शोकांतिका होते.माणसाचे माणूसपण हिरावून घेतले जाते. या सर्वांचे दर्शन दलित नाटकातून होते यासाठी काही मोजक्याच नाटकांचा परामर्श घेता येईल . उदा.प्रेमानंद गज्वी यांच्या 'देवनवरी' या नाटकात समाजातील देवदासींची समस्या मांडली आहे. या नाटकात देवदासी असणाऱ्या द्रौपदीची विटंबना गावकरी करतात.तिचे शारीरिक शोषण गावकऱ्याकडून केले जाते. या नाटकात द्रौपदीची शोकांतिका होताना दिसते.पण ही शोकांतिका नशीबाने किंवा नियतीने होत नाही किंवा तिच्या ठिकाणी असणाऱ्या चांगल्या किंवा वाईट गुणामुळे होत नाही तर ती येथील धर्म व्यवस्थेने निर्माण केलेल्या अनिष्ट प्रथामुळे होते.या अनिष्ट प्रथा चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून आलेल्या आहेत.म्हणून दलित नाटकातील शोकांतिका या जाती व्यवस्था आणि चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून आलेल्या आहेत रामनाथ चव्हाण यांच्या 'बायको मी देवाची' या नाटकात मुरळीची अनिष्ट प्रथा मांडली आहे.देवनवरी प्रमाणे याही नाटकात दलित स्त्रियांचे शारीरिक शोषण करून त्यांची विटंबना केली जाते .आणि माणुसकीला काळीमा फासला जातो यासंबंधी या नाटकातील सारजा थेट देवालाच प्रश्न विचारताना म्हणते की ",खंडोबाराया माझ्या आईशी तु लग्न केलस तिची मी मुलगी आहे आईच्या नात्याने तु माझा बाप आहेस ,अस बाप-लेकीच नात असताना तू माझ्याशी लग्न केलस. आता माझ्या पोटी एक पोरगी जन्माला आली तिचा तू आजा आहेस आणि माझ्या नात्याने बापही आहेस .तू तुझ्या नातीशी लग्न करणार आहेस काय?तुझ्या मुलीशी लग्न करणार आहेस काय?एकाच वेळी आईशी ,मुलीशी ,नातीशी लग्न करण्याची तुझी रीत कोणती मला उत्तर हवय!" ५ या उद्गारातून त्या स्त्रियांची देवाच्या नावाने होणारे शोषण आणि विटंबना यामुळे दलित स्त्रियांची शोकांतिका घडते.ही शोकांतिका येथील धर्मव्यवस्था आणि चातुर्वर्ण व्यवस्थेमुळे होते म्हणूनच दलित नाटकातील शोकांतिका या पारंपरिक नाटकापेक्षा वेगळ्या आहेत.

प्रेमानंद गज्वी यांच्या 'घोटभर पाणी ' या एकांकिकेत जातीयता आणि अस्पृश्यत्वामुळे वाट्याला आलेले दुख ,अन्याय ,अत्याचार यांचे दर्शन घडते. घोटभर पाण्यासाठी दलिताना पाणवठ्यावर तिष्ठत बसावे

लागते हे जिवंत वास्तव या एकांकिकेत पाहण्यास मिळते.आंबेडकरी चळवळीने आत्मभान प्राप्त झालेला तरुण सवर्णाना प्रश्न विचारताना म्हणतो की,"अजून किती दिस पियाच र वड्याच पाणी ?" ६ या प्रकारे दलित माणसांची होणारी कोंडी या नाटकात मांडली आहे.यासारखी अनेक नाटकांची नावे सांगता येतील एकंदरीत दलितांची होणारी शोकांतिका ही जाती व्यवस्था,अस्पृश्यता,अंधश्रद्धा ,अनिष्ठ प्रथा,उच्च नीच भेदभाव यामुळे होताना दिसते.त्यामुळे दलित नाटकातील शोकांतिका या पारंपरिक मराठी नाटकापेक्षा वेगळ्या आहेत.निबंधाच्या विस्तारभयास्तव काही मोजक्याच नाटकांचा येथे विचार केला आहे.

## निष्कर्ष :

१) दलित नाटकाला समृद्ध अशी परंपरा आहे

२) दलित नाटक लोकरंगभूमीवरील लोककलामधून विकसित झाले आहे.

३) दलित नाटकाला जोतीराव फुले ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर याच्या विचारांची प्ररणा मिळाली आहे.

४) दलित नाटक हे व्यक्ती केंद्रित नसून ते समूहकेन्द्री आहे

५) दलित नाटक समस्या प्रधान आहे .या समस्या जातीयव्यवस्थेतून चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून आलेल्या आहेत

६) पारंपरिक मराठी नाटकापेक्षा दलित नाटक आशयाच्या दृष्टीने भिन्न आहे.

## संदर्भ टिपा : .

१. कर्डक भीमराव :आंबेडकरी जलसे स्वरूप आणि कार्य,अभिनव प्रकाशन मुंबई प्र.आ.१९७८ ,पृ ४

२. क-हाडे सदा ,शोकनाट्याचे साहित्यरूप,लोकवाड्मय गृह मुंबईप्र.आ.१९७८ पृ.११

३. अंजनीकर भगवान(संपा.) शब्दशिल्प,दलित नाटकातील शोकांतिका –यादव गायकवाड जाने.१९९० पृ.५

४. क-हाडे सदा: तैत्रव पृ. ७

५. चव्हाण रामनाथ :बायको मी देवाची ,श्रीविद्या प्रकाशन,पुणे प्र.आ १९९१ पृ.२२